# उप वनसंरक्षक, रोहा वनविभाग - रोहा यांचे कार्यालय,

कार्यालय दुरध्वनी क्रमांक : ०२१९४ / २३५७५५. email - dcfroha@gmail.com

---

विषय:- **वनजमीन रायगड**
नागलोली साठवण तलाव, ता. श्रीवर्धन,
रायगड वन प्रस्ताव सादर करणे बाबत.
क्षेत्र ६.५.० हे.

जावक क्रमांक ब/२०/जमीन/ ४६४० /२०१४-१५.
रोहा ४०२ १०९, दिनांक:- २२ /११/२०१४.
०१/२०१५

प्रति,

कार्यकारी अभियंता,
लघुसिंचन (जलसंधारण)विभाग,
कळवा, ठाणे.

संदर्भ:- १) कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण)विभाग, कळवा, ठाणे पत्र क्र. ल.सि.(जसं)वि/प्रशा-२/२३९२ दिनांक १९/९/२०१४ (प्राप्त दिनांक २२/९/२०१४).
२) या कार्यालयाचे पत्र क्र./ब/२०/जमीन/२९७० दि.२५/९/२०१४
३) कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण)विभाग, कळवा, ठाणे. यांचे कडील दिनांक ७/११/२०१४ चे दुरध्वनी संदेश.
४) या कार्यालयाचे पत्र क्र.ब/२०/जमिन/३६१९ दि.२६.११.२०१४
५) आपलेकडील पत्र क्र.ल.सिं.(जसं) वि/प्रशा-१ दि.२८७० दि.०१.१२.२०१४.

आपण संदर्भीय पत्रान्वये नागलोली साठवण तलाव योजने अंतर्गत समाविष्ठ होणारे वनक्षेत्र ६.५ हेक्टर चा वनजमीन मागणीप्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. प्रस्तावातील नकाशा व तदअनुषंगी कागद पत्राची तपासणी केली असता त्यामध्ये खालील प्रमाणे त्रृटी दिसून येत आहेत.

१. गट क्र.१३६ चे सर्वे क्र.१६/३/५ चे ७/१२ भोगवटदार सदरी रिझर्व फॉरेस्ट व इरत अधिकारात वन असे नमूद केले आहे तसेच गट क्र.११५ चे १६/३/७ चे ७/१२ भोगवटदार सदरी रिझर्व फॉरेस्ट व इतर अधिकारात वन असे नमूद केले आहे, सरदचे सर्वे नं. Area statement मधील Legal Status of land या रकान्यात सदरच्या क्षेत्राचा उल्लेख महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनिमय १९७५ अंतर्गत खातेदारस पुर्न:स्थापित असे दर्शविलेले आहे.

तरी विषयांकित कामी area statement मध्ये दर्शविलेले सदर सर्वे नं.१६/३/५,१६/३/७ चे पुर्न:स्थापनेचे आदेश सादर करावे. अथवा सदरचे क्षेत्राचा वैधनिक दर्जा Area statement मधील (Legal Status of land) या रकान्यात दुरूस्ती करून सादर करून प्रस्ताव फेर सादर करावा.

उप वनसंरक्षक,
रोहा वनविभाग, रोहा.

सोबत:- वरील प्रमाणे